I.O/

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S.(ठाणे):** टेंभुर्णी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0659 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 20/10/2024 07:13

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 19/10/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 19/10/2024

**Time From (वेळेपासून):** 16:28 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 19:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 20/10/2024 **Time (वेळ):** 06:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 009

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/10/2024 06:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** आकुंबे तामाढा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रवींद्र भास्कर नरसाळे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जळोली तालुका पंढरपूर,करकंब ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जळोली तालुका पंढरपूर,करकंब ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9767776624

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दत्ता नारायण शेटे | | | 1. शरयु बिल्डींग, फ्लट नं 4 बी, म्हाडा कलनी,मोरवाडी, पिंपरी , पिंपरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | प्रमोद वाल्मीकी सुरवसे | | | 1. घर नं 243, हरीहर महाराज मठाजवळ,पंढरपूर,पंढरपूर शहर ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनी नोटाचे 17 बंडल मध्ये एकुण 6,14,000/ रुपये | 614,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | भारतीय चलनी नोटा एकुण 50,000/ रुपये | 50,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

664,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादी जबाब दि. 20.10.2024

मी श्री. रवींद्र भास्कर नरसाळे, वय 37 वर्षे, व्यवसाय - खते व शेती औषधे निर्मिती कंपनी, रा. मुक्काम पोस्ट जळोली तालुका पंढरपूर जिल्हा सोलापूर (शिक्षण - बीएससी अँग्री. ) मो.नं. 9767776624 समक्ष फिर्यादी जबाब देतो की,

मी दि. 19/10/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक श्री महाडिक यांचे समक्ष उपस्थित राहून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. माझ्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता पोनि महाडिक यांनी दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व सदर ठिकाणी माझी व दोन्ही पंचांची एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,

माझे मालकीची जळोली ता. पंढरपूर येथे सनरीच अँग्रो इंडस्ट्रीज, नावाची एक खत व औषधे निर्मिती कंपनी असुन माझ्याकडे नमुद कंपनीचे अधिकृत परवाना आहे. माझ्या सदर खत कंपनी मधून सोलापूर जिल्ह्यात विविध ठिकाणी डीलर मार्फतीने खते व शेती औषधांची विक्री केली जाते. आज दिनांक 19/10/2024 रोजी दुपारी 12.00 वा. चे सुमारास कृषी विभागाचे कॉलेटी कन्ट्रोलर श्री दत्ता शेटे हे माझ्या कंपनीची खते व शेती औषधी विक्री करणारे प्रियंका कृषी उद्योग, मंद्रूप येथे तपासणी करीता जावुन तेथुन माझ्या कंपनीची खते व शेती औषधांचा दर्जा खराब असल्याबाबत सांगुन त्यांचे सॅम्पल घेतले असुन आता ते तपासणीला पाठवून तुझ्यावर मोठी कारवाई करतो असे म्हणू लागले त्यावर मी त्यांना माझ्या कंपनीवर कोणतीही कारवाई न करणे बाबत विनंती केली असता शेटे साहेब यांनी मला त्यासाठी 50,000/- रुपये लाचेची मागणी करीत असुन कृषी कॉलेटी कन्ट्रोलर शेटे यांनी मला आज दि. 19/10/2024 रोजी दुपारी 04.30 वा. शेटफळ येथे भेटण्याकरीता बोलाविले आहे. तरी कृषी कॉलेटी कन्ट्रोलर शेटे यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली.

कृषी कॉलेटी कन्ट्रोलर शेटे यांनी मला शेटफळ येथे बोलाविले असल्याने शेटफळ येथील हॉटेल सागर येथे जावुन थांबण्याचे व सदर ठिकाणावरुन क्वॉलिटी कन्ट्रोलर शेटे हे जेथे बोलावतील तेथे जावुन त्यांचेवर पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्याअनुषंगाने मी माझ्या चारचाकी वाहनामधुन व पोनि महाडिक, तसेच त्यांचा स्टाफ व दोन्ही पंच असे शासकीय वाहनाने कार्यालयातुन निघुन शेटफळ येथील हॉटेल सागर येथे जावुन थांबलो. त्यानंतर पोनि महाडिक यांनी त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्याची संपूर्ण माहीती मला तसेच दोन्ही पंचांना देवून त्या व्हाईस रेकॉर्डमध्ये त्यांचेकडील नवीन मेमरीकार्ड टाकले त्यानंतर कॉलेटी कन्ट्रोलर शेटे यांची समक्ष भेट घेण्याचे ठिकाण निश्चित करण्याकरीता पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन मी माझ्या मोबाईलवरुन शेटे यांचा मोबाईल क्रं. 9404963696 वर 16.28 वा. फोन करुन स्पीकर ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये मी त्यांना त्यांचे सांगणेप्रमाणे शेटफळ येथे आलो असल्याचे सांगीतले. त्यावर शेटे साहेब यांनी त्यांना येण्यास थोडा उशीर होणार असल्याचे सांगीतले. सदरचे फोनवरुन झालेले संभाषण पोनि महाडिक यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरव्दारे

मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत करुन घेतले.

त्यानंतर बराचवेळ होवुन देखील शेटे साहेब न आल्याने मी पुन्हा 17.50 वा. त्यांचा व्हॉटस्अॅप मो.क्रं.वर कॉल करुन स्पीकर ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये शेटे साहेब यांनी ते मोहोळ येथे आले असुन लगेच पुढे येतो असे सांगीतले. सदरचे फोनवरुन झालेले संभाषण पोनि महाडिक यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत करुन घेतले.

त्यानंतर 18.16 वा. चे सुमारास मला शेटे साहेब यांचा फोन आला तो मी रिसिव्ह करुन स्पीकर ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये शेटे साहेब यांनी मला माझे लोकेशन टाकण्यास सांगीतले. सदरचे फोनवरुन झालेले संभाषण पोनि महाडिक यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत करुन घेतले. त्यानंतर शेटे साहेब यांचे सांगणेप्रमाणे मी माझ्या व्हॉटस्अॅपवरुन माझे करन्ट त्यांना लोकेशन सेंड केले.

त्यानंतर 18.27 वा. चे सुमारास मला शेटे साहेब यांचा व्हॉटस्अॅप कॉल आला. तो मी रिसिव्ह करुन स्पीकर ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये शेटे साहेब यांनी मला शेटफळ ब्रीजच्या पुढे अदित्य पेट्रोलपंप येथे येण्यास सांगीतले. सदरचे फोनवरुन झालेले संभाषण पोनि महाडिक यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत करुन घेतले. शेटे साहेब यांनी मला लाच रक्कमेच्या अनुषंगाने शेटफळ ब्रीजच्या पुढे अदित्य पेट्रोलपंप येथे येण्यास सांगीतले असल्याने काही अंतर पुढे जावुन तेथुन कॉलेटी कन्ट्रोलर शेटे यांचेवर पडताळणी कारवाई करीता मला व पंच 01 यांना रवाना करण्याचे ठरविण्यात आले. त्याप्रमाणे मी, पोनि महाडिक, दोन्ही पंच असे माझ्या चारचाकी वाहनाने व सापळा पथक हे शासकीय वाहनाने निघालो. व सदरवेळी वाहनातच पोनि महाडिक यांनी मला तसेच पंच 01 यांना पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या त्यानंतर आम्ही सर्वजण ओंकार लॉजच्या समोर जावुन थांबलो. तेवढयात मला शेटे साहेबांचा फोन आला सदरचा कॉल मी रिसिव्ह करुन स्पीकर ऑन करुन संभाषण केले. त्यामध्ये शेटे साहेब यांनी मला कोठे आहे असे विचारले. त्यावर मी त्यांना ओंकार लॉज येथे असल्याबाबत सांगुन सदर ठिकाणी त्यांना येण्यास सांगीतले. सदरचे फोनवरुन झालेले संभाषण पोनि महाडिक यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डरव्दारे मेमरीकार्डवर ध्वनीमुद्रीत करुन घेतले.

शेटे साहेब हे माझ्यापासुन काहीअंतरावरच असल्याने पोनि महाडिक यांनी लगेच पुन्हा व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना पायी पाठविले. त्याप्रमाणे आम्ही काही अंतर चालत गेलो असता समोरुन शेटे साहेब हे देखील पायी चालत तेथे आले. तेथे मी व पंच 01 असे त्यांचेजवळ जावुन त्यांना नमस्कार केला. त्यानंतर सदर ठिकाणी शेटे साहेब यांनी त्यांचे उजव्या हाताने पैसे मागणीचा इशारा करीत काय करतो असे म्हणुन लाच रक्कमेची मागणी केली त्यावर मी तडजोड करण्याचा प्रयत्न केला असता शेटे साहेब यांनी मी तुल रिजनेबल सांगीतलय असे म्हणाले. त्यावर मी शेटे साहेब यांना साहेब 50,000/- आकडा लय होतय असे म्हणुन लाच रक्कमे मध्य तडजोड करण्याचा प्रयत्न केला परंतु शेटे साहेब यांनी त्यास नकार दिला. त्यावर मी त्यांना 10 मिनिट थांबा असे म्हणालो परंतु शेटे साहेब हे खुप घाई करीत होते. तरी त्यांना 10 मिनिट थांबा असे म्हणुन पंच 01 यांचे सह काही अंतरावर थांबलेल्या पोनि महाडिक थांबलेल्या ठिकाणी परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली.

कॉलेटी कन्ट्रोलर शेटे यांनी माझ्याकडे 50,000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाल्याने तसेच शेटे साहेब हे अतिशय घाई करीत असल्याने तात्काळ त्यांचेवर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही ही वाहनात करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 50,000/- रुपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवण्यात आल्या. त्यानंतर मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर कॉलेटी कन्ट्रोलर शेटे यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील चारचाकी वाहनातुन ओंकार लॉजच्या समोर जाणेकरीता रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच 01 असे सदर ठिकाणी गेलो असता तेथे शेटे साहेब दिसुन आले नाहीत. त्यामुळे मी त्यांना माझे मो.क्रं. वरुन फोन केला असता ते मी उशीर केल्यामुळे मला रागवु लागले. त्यावर मी त्यांना थांबण्याची विनंती केली असता शेटे साहेब यांनी मला सोलापूर – पुणे महामार्गावरील मार्केट यार्ड येथे येण्यास सांगीतले. त्याबाबत पंच 01 यांनी पोनि महाडिक यांना व्हॉटस्अॅपद्वारे कळविले.

त्यानंतर पोनि महाडिक, पचं 02 असे आमच्याजवळ येवुन व्हॉईस रेकॉर्डर बंद करुन हकीकत जाणुन घेतली व पुढील सुचना देवुन पुन्हा कॉलेटी कन्ट्रोलर शेटे यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील चारचाकी वाहनातुन सोलापूर – पुणे महामार्गावरील मार्केट यार्ड येथे जाणेकरीता रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा

पथक असे शासकीय वाहनातुन सदर ठिकाणी येवुन परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच 01 असे सदर ठिकाणी गेलो असता तेथे मार्केट यार्डचे बाहेर शेटे साहेब माझे मित्र प्रमोद सुरवसे यांचेसह उभे होते. मी व पंच 01 असे त्यांचे जवळ जावुन त्यांना तेथे शेजारीच असलेल्या चहाच्या कॅन्टीनवर चहा पिण्याकरीता घेवुन गेलो. सदर ठिकाणी मी शेटे साहेब यांना त्यांनी माझ्या कंपनीचे खते व शेती औषधांचे घेतलेले सॅम्पल परत द्या असे म्हणालो. त्यावर शेटे साहेब यांनी हाताने पैश्याचा इशारा केला. त्यावर मी माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाच रक्कम काढुन त्यांचे समोर धरली सदरची लाच रक्कम शेटे साहेब यांनी चहाच्या टेबलवर ठेवणेबाबत इशारा केला त्याप्रमाणे मी सदरची लाच रक्कम त्यांचे समोरील टेबलवर ठेवली. त्यानंतर शेटे साहेब यांनी प्रमोद सुरवसे यास सदरची लाच रक्कम त्यांचे शासकीय गाडीमध्ये ठेवण्यास सांगीतले. त्याप्रमाणे प्रमोद याने सदरची लाच रक्कम ही शेटे साहेब यांच्या शासकीय गाडीमध्ये नेहुन ठेवली.

त्यावर मी लागलीच लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजित इशारा केला त्यावरुन पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे सदर ठिकाणी येवुन त्यांनी शेटे साहेब व प्रमोद सुरवसे खाजगी इसम यांना पकडले. सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी कृषी कॉलेटी कन्ट्रोलर शेटे यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव दत्ता नारायण शेटे, वय - 42 वर्षे, पद – तंत्र अधिकारी (गुणवत्ता नियंत्रक) नेमणुक – विभागीय कृषी सह संचालक कार्यालय पुणे, रा. शरयु बिल्डींग, फ्लॅट नं. 4 बी 102, म्हाडा कॉलनी, मोरवाडी, पिंपरी पुणे असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी लाचेची रक्कम घेवुन शेटे यांच्या शासकीय वाहनामध्ये नेवुन ठेवणा-या खाजगी इसमास त्यांचे नाव गाव विचारले असता नमुद इसमाने त्यांचे नाव प्रमोद वाल्मीकी सुरवसे, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती, रा. घर नं 243, हरीहर महाराज मठाजवळ, पंढरपूर ता. पंढरपूर जि. सोलापूर असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोनि महाडिक यांनी सदर ठिकाणी चहा कॅन्टीनच्या शेडमध्ये लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या करून अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालय येथे आलो सदर ठिकाणी पोनि महाडिक यांनी शेटे साहेब यांच्या शासकीय वाहनाची झडती घेतली असता त्यांच्या शासकीय वाहनाच्या पाठीमागील बाजुस असलेल्या बॅग मध्ये भारतील चलनी नोटांचे 17 बंडल मध्ये एकुण 6,14,000/- रुपये मिळुन आले. त्यानंतर सदर ठिकाणी पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 19/10/2024 रोजीचे 16.28 ते 19.30 वा. च्या दरम्यान आरोपी लोकसेवक दत्ता नारायण शेटे, पद - तंत्र अधिकारी (गुणवत्ता नियंत्रक) नेमणुक – विभागीय कृषी सह संचालक कार्यालय पुणे, यांनी आपले स्वत:चे पदाचा दुरूपयोग करून तक्रारदार यांच्या कंपनीतुन उत्पादन झालेले खते व शेती औषधांचे सॅम्पल घेवुन त्यावरुन तक्रारदार यांचे कंपनीवर कोणतीही कारवाई न करण्याकरीता शेटफळ ते मोडनिंब रोडवर असलेल्या हॉटेल ओंकार लॉज समोर रस्त्यावर 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदरची लाच रक्कम सोलापूर – पुणे महामार्गावरील परफेक्ट कृषी मार्केट यार्ड समोरील चहा कॅन्टीनवर स्विकारुन सदरची रक्कम ही खाजगी इसम प्रमोद सुरवसे यांचेकरवी त्यांचे शासकीय वाहनामध्ये ठेवली असल्याने माझी आरोपी लोकसेवक दत्ता नारायण शेटे, पद - तंत्र अधिकारी (गुणवत्ता नियंत्रक) नेमणुक – विभागीय कृषी सह संचालक कार्यालय पुणे, तसेच खाजगी इसम प्रमोद वाल्मीकी सुरवसे यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीला असता तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

पोलीस ठाणे अंमलदार
टेंभुर्णी पोलीस ठाणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Dipak jyotiram patil(I (Inspector)) / 12501000362pdjpm7601w

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

***F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.*** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 ***Signature/Thumb impression of the complainant / informant.*** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकारी यांची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Dipak jyotiram patil

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): 12501000362pdjpm76(